<u>आमदार स्थानिक विकास कार्यक्रम</u>
सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी लेखाशीर्ष ४५१५ ००१२ अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीचे विधानमंडळ सदस्यनिहाय निधी वितरण.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन ज्ञापन क्रमांक-स्थाविका-०५१९/प्र.क्र. ५७ /का-१४८२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - १२ जुलै, २०१९.

<u>**वाचा**</u>:- १) नियोजन विभाग, शासन निर्णय, क्रमांक- स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/का.१४८२, दि. १२.७.२०१६
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र. ४४/अर्थ-३, दि. ०१ एप्रिल, २०१९
३) नियोजन विभाग, ज्ञापन समक्रमांक, दिनांक २४.५.२०१९
४) नियोजन विभाग, शासन शुध्दीपत्रक, समक्रमांक दिनांक २० जून, २०१९
५) नियोजन विभाग, परिपत्रक क्र. स्थाविका-०६१९/प्र.क्र.७६/ का. १४८२, दिनांक २८ जून, २०१९

ज्ञापन :-

"महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, २०१९" मंजूर केले असून ते महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या अधिसंमतीनुसार महाराष्ट्र अधिनियम क्र. २ म्हणून, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४, दिनांक ८ मार्च, २०१९ यामध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये एकूण **₹ ७३४,००,००,०००/- (अक्षरी रुपये सातशे चौतीस कोटी फक्त)** इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. सन २०१९-२० या वर्षाकरिता सदर संपूर्ण निधी लेखानुदान स्वरुपात वितरणासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यापैकी राज्यातील २८८ विधानसभा सदस्यांना तसेच ७८ विधानपरिषद सदस्यांना अनुज्ञेय असलेला एकूण ७१६,२१,५६,०००/- एवढा निधी यापूर्वीच वितरीत करण्यात आला आहे.

२. आता मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी श्री. प्रशांत परिचारक, वि.प.स. यांचे निलंबन मागे घेतले असल्याने त्यांना त्यांच्या निलंबन कालावधीतील निधी उपलब्ध करून देण्यास शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचा रु.२.०० कोटी एवढा निधी वितरीत करण्यात येत असून सदर निधी जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या अधिनस्त ठेवण्यात येत आहे. सन २०१८-१९ च्या निधीची मागणी पुरवणी मागणीद्वारे करण्यात आली असल्याने सदर निधी वित्त विभागाच्या मान्यतेनंतर स्वतत्रपणे वितरीत करण्यात येईल.

४. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/का.१४८२, शासन निर्णय दिनांक १२ जुलै, २०१६ च्या तरतुदींच्या अधीन राहून या निधीचे पुढील वितरण तात्काळ करावे.

५. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. स्थाविका-०६१६/ प्र.क्र.९६/का.१४८२, दिनांक १२ जुलै, २०१६ अन्वये विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांत बसणारी कामे जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी मंजूर करावीत. सदर निधीचा विनियोग करतांना अर्थसंकल्पीय नियमांचे तसेच वित्तीय अधिकार नियमांचे तसेच वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील अटी व शर्तींचे पालन करण्यात यावे. तसेच विविध स्तरावरील सार्वत्रिक निवडणुकांच्या आचारसंहितेचा कालावधी तसेच केंद्र व राज्य निवडणुक आयोगाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन निधीचा विनियोग करावा. वितरीत केलेल्या निधीचा विनियोग पूर्णपणे होईल याची जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दक्षता घ्यावी. तसेच या निधीमधून झालेल्या खर्चाचा ताळमेळ घेण्याची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण करावी.

६. वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१९ / प्र.क्र. ४४ / अर्थ-३, दि. ०१ एप्रिल, २०१९ ला अनुसरुन हे ज्ञापन निर्गमित करण्यात येत आहे.

७. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर हे ज्ञापन उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०७१२१७०७५६०३१६ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

VIJESING FATTESING VASAVE

Digitally signed by VIJESING FATTESING VASAVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5494d2ad3a3bc5ddd66daf9a8f17ceec5e2d7d4b6a8bba99c51d275801bcdf1b, cn=VIJESING FATTESING VASAVE
Date: 2019.07.12 17:13:21 +05'30'

(वि.फ.वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१ मा. मंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
२ मा.राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
३ प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र मुंबई
४ जिल्हाधिकारी, सोलापूर
५ उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्तांचे कार्यालय, पुणे
६ जिल्हा नियोजन अधिकारी, सोलापूर
७ जिल्हा कोषागार अधिकारी, सोलापूर
८ वित्त विभाग (कार्यासन अर्थ-१६/व्यय-८),
९ नियोजन विभाग, अर्थसंकल्प कक्ष (का.१४२४),
१० ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी, नियोजन विभाग,
११ निवड नस्ती-का/१४८२, नियोजन विभाग,